# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- मौजा-लेन्ड्रा शिट क्र. ५५, (५) न.भु.क्र. ८८७,
**{स्थावर विभाग}** रामदासपेठ येथील मनपा मराठी प्राथमिक कन्या शाळा, नागपूर उक्त शाळेची इमारत "**भरोसा सेल**" करिता १२ महिने कालावधीकरीता पोलीस विभागाकडे हस्तांतरीत करणेबाबतचा प्रश्न विचारत घेणे.

नागपूर शहराअंतर्गत आयुक्तलय नागपूर यांचे आस्थापनेवर महिल्यांच्या समंस्याचे निराकरण करणेसाठी भरासो सेल कार्यरत असून परिवारीक समंस्या आपसी वादविवाद इत्यादीबाबत समुपदेश करुन नागरीकांच्या समंस्या सोडविण्याच्या दृष्टीने भरोसा सेल अत्यंत महत्वाची भुमीका पार पाडत आहे.

त्याअनुषंगाने, मनपा मराठी प्राथमिक कन्या शाळा, नागपूर उक्त शाळेची इमारत "**भरोसा सेल**" करिता प्रती माह रु. **९६३५०/-** प्रतिमाह याप्रमाणे १२ महिने कालावधीकरीता **११५६१९६/-** वार्षिक भुभाडे वसुली करुन विषयांकित शाळेची इमारत पोलीस आयुक्त कार्यालयाकडे तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीला अधिन राहुन हस्तांतरीत करण्याचा प्रश्न विचारत घेणे.

**अटी व शर्ती** :-

१) विषयांकीत शाळेचे बांधीव क्षेत्र पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर यांना द्यावयाचे झाल्यास, **१२ महिन्याकरीता कालावधीकरीता** भाडेतत्वावर देण्यात येईल.

२) पोलीस आयुक्त कार्यालयास १२ महिन्यांचे एकूण **भाडे रु. ११५६१९६ /-** भरणा करणे बंधनकारक राहील.

३) भाडेतत्वावर देण्यात आलेल्या इमारतीमध्ये पोट भाडेकरु ठेवता येणार नाही.

४) महानगरपालिकेला विषयांकित जागेची किंवा इमारतीची आवश्यकता भासल्यास, त्या स्थितीत ३० दिवसांचे पूर्व सुचनेवर जागा/इमारत परत घेण्यात येईल. यास पोलीस आयुक्त कार्यालयाचा उजर राहणार नाही.

५) पोलीस आयुक्त कार्यालयास इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचे बांधकाम(फेरबदल), प्रयोजनात बदल करता येणार नाही. **बांधकामात/वापरात बदल आढळुन आल्यास शर्तभंग समजण्यात येवून** महानगरपालिकेमार्फत तशी नोटीस देवून सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

६) सदर जागेची व इमारतीची दुरुस्ती (Maintenance)तसेच विद्युत, पाणी, साफ-सफाई याबाबतची जबाबदारी उपरोक्त पोलीस आयुक्त कार्यालयाची राहील.

७) इमारत परत करण्यापुर्वी, सदर पोलीस आयुक्त कार्यालयाने संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे, किमान आहे त्या स्थितीत महानगरपालिकेस परत करतील. याबाबत सदर पोलीस आयुक्त कार्यालयाने **हमीपत्र देणे** बंधनकारक राहील.

८) भाडेतत्वावर देण्यात आलेल्या इमारतीचा **करारनामा रु ५००/-** चे स्टॉम्प पेपरवर पोलीस आयुक्त कार्यालयास करणे बंधनकारक राहील.

९) भाडेतत्वाचे कालावधी संपल्यानंतर मागणी प्रमाणे **नुतनीकरण करण्याचे अधिकार महानगरपालिकाकडे राहील.**

१०) मुळ भाडे करारनाम्यातील अटी व शर्ती व्यतिरिक्त महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी शर्ती करारनाम्यात अंर्तभुत करण्यात येतील.

११) उपरोक्तबाबत कोणत्याही निर्णयासंबंधीचे **संपुर्ण अधिकार मा. आयुक्त मनपा, नागपूर यांचेकडे सुरक्षित राहील** व ते पोलीस आयुक्त कार्यालयास बंधनकारक राहील.

१२) भाडेकराराचे नुतनीकरण करतांना भाडेकरार नोंदणीकृत करणे आवश्यक राहील. तसेच करारनामा करतांना मुळभाडे करारनाम्यातील अटी व शर्ती देखील विचारात घेवून महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी शर्ती करारनाम्यात अंर्तभुत करण्यात येईल.

मौजा-लेन्ड्रा शिट क्र. ५५(५) न.भु.क्र. ८८७, रामदासपेठ येथील मनपा मराठी प्राथमिक कन्या शाळा, नागपूर उक्त शाळेची इमारत "**भरोसा सेल**" करिता १२ महिने कालावधीकरीता पोलीस विभागाकडे हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्तावास मा. आयुक्त महोदयांनी दि. ०७/०५/२०२५ रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे.

करिता उपरोक्त प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 10/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 07/05/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा-लेन्ड्रा शिट क्र. ५५, (५) न.भु.क्र. ८८७, रामदासपेठ येथील मनपा मराठी प्राथमिक कन्या शाळा, नागपूर उक्त शाळेची इमारत "**भरोसा सेल**" करिता १२ महिने कालावधीकरीता पोलीस विभागाकडे हस्तांतरीत करणेबाबतचा प्रश्न विचारत घेणे.

नागपूर शहराअंतर्गत आयुक्तलय नागपूर यांचे आस्थापनेवर महिल्यांच्या समस्याचे निराकरण करणेसाठी भरासो सेल कार्यरत असून परिवारीक समस्या आपसी वादविवाद इत्यादीबाबत समुपदेश करुन नागरीकांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने भरोसा सेल अत्यंत महत्वाची भुमीका पार पाडत आहे.

त्याअनुषंगाने, मनपा मराठी प्राथमिक कन्या शाळा, नागपूर उक्त शाळेची इमारत "**भरोसा सेल**" करिता प्रती माह रु. **९६३५०/-** प्रतिमाह याप्रमाणे १२ महिने कालावधीकरीता **११५६१९६/-** वार्षिक भुभाडे वसुली करुन विषयांकित शाळेची इमारत पोलीस आयुक्त कार्यालयाकडे तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीला अधिन राहुन हस्तांतरीत करण्याचा प्रश्न विचारत घेणे.

**अटी व शर्ती** :-

१) विषयांकीत शाळेचे बांधीव क्षेत्र पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर यांना द्यावयाचे झाल्यास**, १२ महिन्याकरीता कालावधीकरीता** भाडेतत्वावर देण्यात येईल.

२) पोलीस आयुक्त कार्यालयास १२ महिन्यांचे एकूण **भाडे रु. ११५६१९६ /-** भरणा करणे बंधनकारक राहील.

३) भाडेतत्वावर देण्यात आलेल्या इमारतीमध्ये पोट भाडेकरु ठेवता येणार नाही.

४) महानगरपालिकेला विषयांकित जागेची किंवा इमारतीची आवश्यकता भासल्यास, त्या स्थितीत ३० दिवसांचे पूर्व सुचनेवर जागा/इमारत परत घेण्यात येईल. यास पोलीस आयुक्त कार्यालयाचा उजर राहणार नाही.

५) पोलीस आयुक्त कार्यालयास इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचे बांधकाम(फेरबदल), प्रयोजनात बदल करता येणार नाही. **बांधकामात/वापरात बदल आढळुन आल्यास शर्तभंग समजण्यात येवून** महानगरपालिकेमार्फत तशी नोटीस देवून सदर मालमत्ता परत घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

६) सदर जागेची व इमारतीची दुरुस्ती (Maintenance)तसेच विद्युत, पाणी, साफ-सफाई याबाबतची जबाबदारी उपरोक्त पोलीस आयुक्त कार्यालयाची राहील.

७) इमारत परत करण्यापुर्वी, सदर पोलीस आयुक्त कार्यालयाने संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे, किमान आहे त्या स्थितीत महानगरपालिकेस परत करतील. याबाबत सदर पोलीस आयुक्त कार्यालयाने **हमीपत्र देणे** बंधनकारक राहील.

८) भाडेतत्वावर देण्यात आलेल्या इमारतीचा **करारनामा रु ५००/-** चे स्टॉम्प पेपरवर पोलीस आयुक्त कार्यालयास करणे बंधनकारक राहील.

९) भाडेतत्वाचे कालावधी संपल्यानंतर मागणी प्रमाणे **नुतनीकरण करण्याचे अधिकार महानगरपालिकाकडे राहील.**

१०) मुळ भाडे करारनाम्यातील अटी व शर्ती व्यतिरिक्त महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी शर्ती करारनाम्यात अंर्तभुत करण्यात येतील.

११) उपरोक्तबाबत कोणत्याही निर्णयासंबंधीचे **संपुर्ण अधिकार मा. आयुक्त मनपा, नागपूर यांचेकडे सुरक्षित राहील** व ते पोलीस आयुक्त कार्यालयास बंधनकारक राहील.

१२) भाडेकराराचे नुतनीकरण करतांना भाडेकरार नोंदणीकृत करणे आवश्यक राहील. तसेच करारनामा करतांना मुळभाडे करारनाम्यातील अटी व शर्ती देखील विचारात घेवून महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्या अतिरिक्त अटी शर्ती करारनाम्यात अंर्तभुत करण्यात येईल.

मौजा-लेन्ड्रा शिट क्र. ५५(५) न.भु.क्र. ८८७, रामदासपेठ येथील मनपा मराठी प्राथमिक कन्या शाळा, नागपूर उक्त शाळेची इमारत "**भरोसा सेल**" करिता १२ महिने कालावधीकरीता पोलीस विभागाकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.